# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२६

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### भंडारा जिल्ह्यात यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत घरकुलांचे बांधकाम अपुर्णावस्थेत असल्याबाबत

**(१) १२८५ (२४-०४-२०२५) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनामार्फत विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना घरकुलाचे लाभ देण्याकरीता यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना राबविण्यात येत असून भंडारा जिल्ह्यात सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत २४३८ घरकुलांचे उद्दीष्ट देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी २३१५ घरकुलांची मंजुरी देण्यात आली होती सदर योजनेची अंमलबजावणी पूर्ण झालेली नसून २३१४ मंजूर घरकुलांपैकी फक्त ८३६ घरकुलांचे बांधकाम पूर्णत्वास गेले आहेत तर १४७९ घरकुलांचे बांधकाम अद्यापही अपूर्ण आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेचा लाभ फक्त ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना देण्यात येत असून महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायत क्षेत्रात ही योजना लागु राहणार नसल्याचे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे, शहरी भागात राहणाऱ्या विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना या योजनेच्या लाभापासून वंचित रहावे लागत असल्याने त्यांना देखील ही योजना लागू करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन घरकुलांचे अपूर्ण बांधकाम पूर्ण करण्याबाबत तसेच या योजनेची व्याप्ती शहरी भागापर्यंत वाढविण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१८-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत भंडारा जिल्ह्यातील २४३८ वैयक्तिक घरकुल लाभार्थ्यांना मंजुरी देण्यात आली आहे.

(२) सदरहू २४३८ घरकुल लाभार्थ्यांपैकी २३१६ घरकुल लाभार्थ्यांची आवास सॉफ्ट प्रणालीवर नोंदणी करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत २३१६ घरकुल लाभार्थ्यांपैकी १६८३ लाभार्थ्यांचे घरकुल बांधकाम पूर्ण झाले असून उर्वरित घरकुलांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.
(३) व (४) यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत तरतुदींनुसार फक्त ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ अनुज्ञेय आहे. शहरी भागातील लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देण्याकरीता गृहनिर्माण विभागामार्फत प्रधानमंत्री आवास योजना-शहरी ही योजना स्वतंत्रपणे राबविण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अडाण नदीवर (ता.मंगळूरपीर, जि.वाशिम) पूल उभारण्याबाबत

**(२) १३०३ (१७-०४-२०२५) श्री.वसंत खंडेलवाल :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अडाण नदीवरील (ता.मंगळूरपीर, जि.वाशिम) इचा-नागी, तराळा -पार्डी, पिंपळखुटा ते तऱ्हाळा, गणेशपुर - घोटा, खरबी – पिंपरी, मोझरी, हिरंगी - गोग्री दाभा या गावांना जोडण्यासाठी पुल बांधण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीनी शासनाकडे दिनांक ६ सप्टेंबर, २०२३ रोजी लेखीपत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम यांना दिनांक १० मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे सदर प्रकरणी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी कामाचे अंदाजपत्रक तयार करून शासनाच्या मंजुरीसाठी सादर करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) याबाबत अधीक्षक अभियंता, अकोला यांना दिनांक ११/०१/२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
(३) व (४) हिंरगी-गोग्री दाभा हा प्रमुख जिल्हा मार्ग असून अडाण नदीवर नाबार्ड-२८ अंतर्गत पुलाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. पिंपळखुटा ते तऱ्हाळा रस्ता ग्रामीण मार्ग दर्जाचा असून सदर ठिकाणी अस्तित्वात असलेल्या पुलाचे बांधकाम प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत करण्यात आले आहे. ईचा-नागी, गणेशपुर-घोटा व खरबी-पिंपरी मोझरी हे योजनाबाहय रस्ते असून तऱ्हाळा ते पार्डी ताड रस्त्यावर पूल बांधण्याचे काम निधी, निकष व प्राधान्यक्रम नुसार हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

## राज्यातील पशुधन पर्यवेक्षकांची रिक्त पदे भरणेबाबत

**(३) १८५७ (२४-०४-२०२५) श्री.सत्यजीत तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.किशोर दराडे, श्री.सचिन अहिर, श्री.हेमंत पाटील, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.संजय खोडके :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पशुधन पर्यवेक्षक वर्ग ३ या पदांच्या ३००० पेक्षा अधिक जागा अनेक वर्षांपासून रिक्त असून सदर पदांची भरती प्रक्रिया त्वरित सुरू करावी तसेच या पदभरती मध्ये एन डी बी किंवा एल एम डी बी अंतर्गत येणाऱ्या सर्व प्रकल्पांमध्ये कृत्रिम रेतन सेवादाता म्हणून सेवा देणाऱ्या अनुभवी उमेदवारांना प्राधान्य देण्याची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त रिक्त जागा भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०३-२०२६) :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

पशुधन पर्यवेक्षकाची एकूण ३७७२ मंजूर पदांपैकी राज्यस्तरीय व स्थानिक अनुक्रमे ३७४ व १३९२ पदे रिक्त आहेत.

पशुधन पर्यवेक्षक या संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये एन.डी.बी. किंवा एल.एम.डी.बी. अंतर्गत येणाऱ्या प्रकल्पांमध्ये कृत्रिम रेतन सेवादाता म्हणून सेवा देणाऱ्या उमेदवारांबाबत अशी कोणतीही तरतुद नाही.

पशुधन पर्यवेक्षकाची रिक्त पदे भरण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग व ग्रामविकास विभागास कळविण्यात आलेले आहे.
(३) लागू नाही.

---

## राज्यातील पशुधन विकास अधिकारी संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४) ३८२८ (१८-०७-२०२५) श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामीण भागात पशुसंवर्धन विभागाचे काम गतीने व पूर्ण क्षमतेने करण्यासाठी पशुसंवर्धन सेवा गट 'अ' अंतर्गत पशुधन विकास अधिकारी पद महत्वाचे असून या संवर्गातील ४६८४ मंजूर पदापैकी २७९५ पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मंजूर पदापैकी २७९५ पदे भरण्याचा निर्णय शासनाने घेतला असून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला पशुसंवर्धन विभागाने तसे मागणीचे निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला पशुसंवर्धन विभागाचे सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३). (४) पशुधन विकास अधिकारी, गट-अ ची २७९५ पदे भरण्यासाठी दिनांक २९/०३/२०२५ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला मागणीपत्र पाठविण्यात आले असून लोकसेवा आयोगाकडून दिनांक २५/०४/२०२५ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून पदे भरण्यासाठीची पुढील कार्यवाही सूरू आहे.

---

## जय वकिल स्कूल फॉर स्पेशल केअर, शिवरी हील, मुंबई या शाळेतील मुख्याध्यापक पद नियमबाहय पध्दतीने भरले गेल्याबाबत

**(५) ४६६० (१०-११-२०२५) श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जय वकिल स्कूल फॉर स्पेशल केअर, शिवरी हील, मुंबई या बंद पडलेल्या शाळेतील मुख्याध्यापकास पदोन्नतीच्या रिक्त मुख्याध्यापक पदावर दिनांक २ मार्च, २०२५ रोजी आयुक्त, दिव्यांग कल्याण यांच्या आदेशान्वये समायोजित करण्यात आले असून सदर समायोजन शिक्षण विषयक शासन अधिनियम व नियमावलीच्या विरोधात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विधान परिषद सदस्य (शिक्षक मतदार संघ, मुंबई) यांनी दिनांक २४ जून, २०२५ रोजी आयुक्तांना लेखी पत्राद्वारे सदर आदेश शासन नियमावलीच्या विरोधात असल्याचे नमूद करून आदेश रद्द करण्याची विनंती केली असून आयुक्त, दिव्यांग कल्याण यांनी अद्याप कोणतीही दुरुस्ती अथवा खुलासा केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बेकायदेशीर आदेश देणाऱ्या व वैधानिक प्रक्रिया न पाळणाऱ्या आयुक्तांविरोधात शासनाने कोणती कारवाई केली तसेच विधान परिषद सदस्यांनी आयुक्ताना सदर आदेश रद्द करण्याबाबत केलेल्या विनंतीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१८-०३-२०२६) : (१)** हे खरे नाही.

आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांनी दिनांक ०२ मार्च, २०२५ रोजीच्या आदेशानुसार, श्री.मुटकुळे दत्तात्रय दिलीप यांचे जय वकिल स्कूल फॉर स्पेशल केअर, शिवरी हील, मुंबई येथे पदानुसार व जातीच्या प्रवर्गानुसार मुख्याध्यापक पदावर समायोजन करण्यात आले आहे.

(२) व (३) होय, हे अंशत: खरे आहे.

श्री.जगन्नाथ अभ्यंकर, मा.विधान परिषद सदस्य यांनी दिनांक २४ जून, २०२५ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण, पुणे यांना श्री.मुटकुळे यांच्या समायोजनाचे आदेश रद्द करुन सदर उपक्रमामधील सेवाज्येष्ठ विशेष शिक्षकास पदोन्नतीने मुख्याध्यापक पदाची मान्यता मिळणेबाबत विनंती केली.

आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण, पुणे यांनी दिनांक ३० सप्टेंबर, २०२५ रोजीच्या आदेशान्वये श्री.मुटकुळे यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांचे समायोजन संजीवनी इन्स्टिट्यूट कराड संचलित मतिमंद मुलांची शाळा, कराड, न.प.शाळा, नं-२, शनिवार पेठ, कराड, जि.सातारा येथे केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कोट्यवधी रकमेच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(६) ४७०८ (१९-११-२०२५) श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सुमारे १३६३ गैरव्यवहार झाले असून यात कोट्यवधी रक्कमेचा अपहार झाल्याची माहिती वित्त विभागाच्या लेखापरिक्षण संचालनालयाच्या अंदाजपत्रकातून माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरिक्षण (ऑडिट) गेल्या दहा वर्षापासून पूर्ण झालेले नसून सदर लेखापरिक्षणाचा अहवाल अजून तयार झाला नसल्यामुळे निधीचा हिशेब पारदर्शक ठेवणे व जबाबदारी निश्चित करणे कठीण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत माहिती घेऊन राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कोट्यवधी रक्कमेच्या अपहाराची चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्याच्या दृष्टीने तसेच अनेक वर्षे प्रलंबित असलेले लेखापरिक्षण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१७-०२-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

वित्त विभागांतर्गत संचालनालय, स्थानिक निधी लेखा परीक्षा यांच्या सन २०२५ -२६ वर्षाच्या कार्यक्रम अंदाज पत्रकामध्ये याबाबतची माहिती नमूद करण्यात आली आहे. त्यानुसार सन २०२३-२४ मध्ये १३९२ नवीन प्रकरणे आढळल्याचे नमूद करण्यात आले आहे.
(२) व (३) सन २०१७-१८ पर्यंतचे सर्व महानगरपालिकांचे लेखापरीक्षण पूर्ण झाले आहे. १४ महानगर पालिकांचे सन २०१८-१९ ते २०२०-२१ चे लेखापरीक्षण पूर्ण झाले असून उर्वरित महानगरपालिकांचे सदर कालावधीचे लेखापरीक्षण सद्य:स्थितीत सुरु आहे.

अस्तित्वातील महानगरपालिकांची श्रेणीवाढ व नवीन महानगरपालिकांमुळे लेखापरीक्षणाच्या कामकाजातही मोठी वाढ असून उपलब्ध कर्मचारी वृंदाकडून हे काम करुन घेण्यात येत आहे.

महानगरपालिकेच्या बदलत्या कामकाज स्वरुपाचा विचार करुन उपलब्ध मनुष्यबळ कमी पडत असल्याने पदसंख्या वाढीबाबतचा महाराष्ट्र लोकसेवा आयोगास प्रस्ताव पाठविण्यात आला असून भरती प्रक्रियेची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## संत रोहीदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाद्वारे राबविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये नवीन योजनांचा समावेश करण्याबाबत

**(७) ४८४० (१४-१२-२०२५) श्री.शशिकांत शिंदे:** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संत रोहीदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्या. या महामंडळाद्वारे राबविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये नवीन योजनांचा समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, उक्त सध्यस्थितीत मंडळामध्ये उपलब्ध असलेल्या योजना या कालबाह्य झालेल्या असून त्याद्वारे मंडळ स्थापनेची उद्दीष्ट पूर्ण होऊ शकत नाहीत तसेच सदरील योजना या ५० वर्षापूर्वी बनलेल्या असून योजनांद्वारे देण्यात येणारे अर्थसहाय्य व अनुदान अत्यंत तुटपुंजे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याकरीता महामंडळाद्वारे राबविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये नवीन योजनांचा समावेश करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री.संजय शिरसाट (०५-०३-२०२६) :** (१) होय हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
संत रोहीदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळास वित्त विभागामार्फत अर्थसंकल्पित केलेल्या निधीप्रमाणे दरवर्षी विभागामार्फत निधी वितरीत करण्यात येतो.
(३) संत रोहीदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाद्वारे राबविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये नवीन योजनांचा समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता.सदर प्रस्तावाबाबत वित्त विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठवाड्यात ११ अप्पर तहसिल कार्यालये स्थापन करणेबाबत

**(८) ४८७२ (१४-१२-२०२५) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तत्कालीन विभागीय आयुक्त उमाकांन्त दांगट समितीने छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्तालयाचे त्रिभाजन करुन छत्रपती संभाजीनगर, लातुर व नांदेड या तीन जिल्ह्यात विभागीय आयुक्तालय स्थापन करण्यासाठी १० वर्षांन्पूर्वी अहवाल शासनाकडे सादर केला असून सदरहू अहवाल अद्याप प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठवाड्यात १ अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय व ११ अप्पर तहसिल कार्यालये नव्याने सुरु करण्यासाठी शासनाच्या सुचनेवरुन विभागीय प्रशासनाने प्रस्ताव शासनाकडे सादर केला, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनस्तरावर प्रलंबित असलेले आयुक्तालयाचे त्रिभाजन अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय व नवीन ११ अप्पर तहसिल कार्यालय, निर्मितीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (२४-०२-२०२६) :** (१)अंशत: खरे आहे. दिनांक १८/०२/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये दांगट समिती बरखास्त करण्यात आली आहे.
(२) व (३) होय, दिनांक २५/०१/२०२५ रोजीच्या शासनपत्रान्वये सर्व विभागीय आयुक्तांकडून आवश्यक कार्यालय निर्मितीचे प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. सदर प्रस्तावांची अभ्यासपूर्ण तपासणी करुन पुढील आवश्यक कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सामाजिक न्याय विभागामार्फत विद्यार्थ्यांसाठी उच्च दर्जाची वसतिगृहे उभारण्याबाबत

**(९) ४९२२ (१४-१२-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.विक्रांत पाटील, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागामार्फत विद्यार्थ्यांसाठी उच्च दर्जाची वसतिगृहे उभारण्याच्या उपक्रमांतर्गत राज्यात एकूण १२० ठिकाणी वसतिगृहे उभारली जाणार असून त्यातून २५ हजार विद्यार्थ्यांना निवासी सुविधा उपलब्ध होणार आहे व त्याकरीता शासनाने १२०० कोटी रुपयांची तरतूद केली असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त प्रकरणी सामाजिक न्याय विभागामार्फत विद्यार्थ्यांसाठी उच्च दर्जाची वसतिगृहे उभारण्याच्या दृष्टीने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (०५-०३-२०२६) :** (१) व (२) होय हे खरे आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत शासकीय वसतिगृह ही योजना कार्यान्वित आहे. सदर योजनेंतर्गत राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या चांगल्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विभाग, जिल्हा व तालुका स्तरावर मागासवर्गीय मुला-मुलींच्या शिक्षणासाठी एकूण ४४२ शासकीय वसतिगृहे कार्यरत असून त्यापैकी एकूण १४९ वसतिगृहांना जागा अप्राप्त असल्यामुळे ती भाडेतत्वावर कार्यरत आहेत. त्यापैकी सन २०२५-२६ वर्षात मंजूर शासकीय वसतिगृहांना जागा उपलब्ध झालेल्या एकूण ३६ शासकीय वसतिगृहांच्या नवीन इमारत बांधकाम अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. यामध्ये एकूण ६००० विद्यार्थ्यांना निवासी सुविधा उपलब्ध होणार आहे.

सामाजिक न्याय विभागामार्फत विद्यार्थ्यांसाठी उच्च दर्जाची वसतिगृहे उभारण्याकरीता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात मागासवर्गीय मुला-मुलींकरीता शासकीय वसतिगृह बांधणे लेखाशीर्ष (४२२५ ०४८१) या योजनेंतर्गत रुपये १२०० कोटी/- इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला असून सदर अर्थसंकल्पीत निधी वित्त विभागामार्फत उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे शहरातील जात वैधता पडताळणी समितीच्या मनमानी कामकाजाची चौकशी करण्याबाबत

**(१०) ४९३६ (१४-१२-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील जात वैधता पडताळणी समितीत सध्या किती सदस्य कार्यरत आहेत व मागील दोन वर्षांमध्ये या समितीकडे एकूण किती जात वैधता पडताळणी प्रकरणे प्राप्त झाली असून त्यापैकी किती प्रकरणांचा निकाल लागला आहे आणि प्रलंबित प्रकरणांची संख्या किती आहे,

(२) असल्यास, काही अर्ज एजंटमार्फत प्राप्त झाल्यास त्यांनाच मान्यता दिली जाते अशी तक्रार नागरिक करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, समितीच्या तीन सदस्यांपैकी श्रीमती वजे मॅडम यांनी केलेल्या अनियमतेबाबत तक्रारी प्राप्त झाल्या असून एजंटमार्फत आलेली प्रकरणेच त्या स्वीकारतात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (२०-०२-२०२६) :** (१) जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, ठाणे या समितीत सद्य:स्थितीत अध्यक्ष, सदस्य, सदस्य सचिव तथा संशोधन अधिकारी असे तीन सदस्य कार्यरत आहेत. सदर समितीकडे मागील दोन वर्षात प्राप्त झालेली प्रकरणे, निकाली काढलेली प्रकरणे व प्रलंबित प्रकरणांची माहिती खालीलप्रमाणे आहे:-अ.क्र. प्राप्त प्रकरणे निकाली प्रकरणे प्रलंबित प्रकरणे
१ १०,१२६ ९,१७८ ९४८

सदरची ९४८ प्रकरणे पुराव्या अभावी प्रलंबित आहेत. सदर प्रलंबित प्रकरणांपैकी २४१ निवडणूक प्रकरणे आहेत. सदर निवडणूक प्रकरणावर उमेदवार निवडून आल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल. तसेच उर्वरित ७०७ प्रकरणामध्ये त्रुटी असून, सदर त्रुटी पूर्ततेबाबत अर्जदारांना कळविले आहे. सदर त्रुटींची पूर्तता झाल्यानंतर विहित मुदतीत अर्जदारांना वैधता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येईल.
(२) हे खरे नाही.
अर्जदार हे जात वैधता पडताळणीसाठीचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने जात पडताळणी समितीच्या सेतू कार्यालयात सादर करतात. तसेच अर्जदार स्वत: आपल्या मूळ कागदपत्रांसह जात पडताळणी समितीच्या सेतू कार्यालयामध्ये कागदपत्रे सादर करतात. सदर अर्जावर प्राथमिक छाननी केल्यानंतर ज्या प्रकरणांमध्ये त्रुटी आहेत अशा अर्जदारांना त्यांच्या मोबाईल क्रमांकावर, ईमेल वर संदेश पाठविला जातो. तसेच त्यांच्या पत्यावर पत्रव्यवहार केला जातो व त्रुटींची पूर्तता झाल्यावर विहित मुदतीत अर्जदारांना ऑनलाईन त्यांच्या ईमेल आयडीवर जात वैधता प्रमाणपत्र निर्गमित केले जाते. त्यामुळे अर्जदारांना पारदर्शक पध्दतीने जात वैधता प्रमाणपत्र मिळते व या प्रक्रियेमध्ये एजंट किंवा त्रयस्थ व्यक्तीचा जात वैधता प्रमाणपत्र मिळविण्याच्या प्रक्रियेमध्ये हस्तक्षेप होत नाही.
(३) हे खरे नाही.

अर्जदार हे जात वैधता पडताळणीसाठीचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने जात पडताळणी समितीच्या सेतू कार्यालयात सादर करतात. त्यामुळे श्रीमती वाजे यांनी एजंटमार्फत अर्ज स्वीकारण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ मधील नियम ११ (ड) नुसार बहुमताने निर्णय पारीत करण्याची तरतूद आहे. त्यानुसार समितीच्या तीन सदस्यांपैकी कोणत्याही एका सदस्यास अर्जदाराचा दावा वैध किंवा अवैध करण्याचा किंवा जात दावा स्वीकारण्याचा / नाकारण्याचा अधिकार नाही. म्हणजेच अर्जदाराच्या जात दाव्यावर समिती सदस्यांच्या बहुमताने निर्णय

घेतला जातो. त्यामुळे श्रीमती वाजे यांना एकट्याने अर्जदाराच्या दाव्याबाबत वैध / अवैध निर्णय घेण्याचा अधिकार नसल्याने, त्यांचेवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती विभागातील करजगाव येथील सागवानी लाकूड वन विभागाने जप्त केल्याबाबत

**(११) ५०५५ (१४-१२-२०२५) श्री.संजय खोडके :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती विभागातील वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी दिनांक १३ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यादरम्यान गुप्त माहितीच्या आधारे करजगाव येथील बोदड रस्त्यावरील टी पॉईंटवरील वॉल कंपाऊंडच्या आतील खुल्या जागेत छापा टाकून लाखो रुपयांचे सागवानी लाकूड जप्त केले असून या अनुषंगाने अज्ञात व्यक्तींविरुध्द गुन्हा क्रमांक ००१३९/३४७० नोंदविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनामार्फत संपूर्ण चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच चौकशीत दोषी आढळलेल्या सबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (१३-०३-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.

अमरावती वनविभागाअंतर्गत परतवाडा परिक्षेत्रातील मौजा करजगांव येथे खुल्या प्लॉट मध्ये दिनांक १३/०८/२०२५ रोजी सागवान लाकुड पडुन असल्याबाबत मिळालेल्या गुप्त माहितीनुसार तेथे तपास केला असता बोदड रस्त्यावरील टी पॉईटं वरील खुल्या प्लॉट मध्ये जप्त केलेले अवैध सागवानी लाकुड सागवान चरपट ११९ नग ६.१६८ घ.मी. साठवून ठेवलेले आढळले. सदर प्रकरणी भारतीय वनअधिनियम १९२७ चे कलम २६(१) फ, नुसार तसेच महाराष्ट्र वननियमावली, २०१४ अन्वये वनगुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तसेच वरील माल ज्यांचे प्लॉटवर जप्त करण्यात आला त्यांचे नांव शेख अहेमद वल्द शेख सत्तार असल्याचे समजले असून त्या प्रमाणे त्यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर इसम हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा असल्याचे माहिती झाली असून तो सद्या फरार आहे. सदर आरोपीचा तपास पोलीस प्रशासनाच्या मदतीसह करण्यात येत आहे. तसेच सदर गुन्हेगाराचा सी.डी. आर सुध्दा मागविण्यांत आलेला असून प्रकरणी पुढील तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही ?

---

## जेष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी आयोग निर्माण करण्याबाबत

**(१२) ५०६५ (१४-१२-२०२५) श्री.संजय खोडके, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागरिकांच्या न्याय्य हक्कांचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या कल्याणासाठी स्वतंत्र असा ज्येष्ठ नागरिक आयोग स्थापन करण्याचा निर्णय केरळ शासनाने घेतला असून ज्येष्ठ नागरिकांसाठी स्थापन

करण्यात आलेला हा देशातील पहिलाच ज्येष्ठ नागरिकांसाठी आयोग ठरला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील वृद्धांच्या पाल्यांकडून होणारे दुर्लक्ष, वृध्दपणातील हेळसांड आणि बेवारस आयुष्य जगावे लागणे अशा ज्येष्ठ नागरिकांशी संबंधित समस्यांचे निराकरण व्हावे या उद्देशाने केरळ राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्रात देखील अशा स्वरुपाचा आयोग स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (०६-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) ज्येष्ठ नागरिकांचे समाजातील स्थान विचारात घेता त्यांना वृध्दापकाळ चांगल्या तऱ्हेने घालविता यावा इ.साठी शासनाने दिनांक १४/०६/२००४ रोजी राज्याचे ज्येष्ठ नागरिक धोरण, २००४ (भाग-१) जाहीर केले आहे. सदर धोरणाच्या अंमलबजावणीकरीता दिनांक ०९/०७/२०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या धोरणाद्वारे राष्ट्रीय धोरणात घालून दिलेल्या तत्वांचे पालन करून मुख्यत: पुढील घटकांवर लक्ष केंद्रीत करण्याचे नमूद केले आहे. अ) ज्येष्ठ नागरिकांसाठी आर्थिक नियोजन करणे. ब)ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेंणे. क) ज्येष्ठ नागरिकांना ताण तणावास तोंड देण्यासाठी सक्षम करणे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय दिनांक १२ सप्टेंबर २०२४ अन्वये ज्येष्ठ नागरिकांना आर्थिक बाबतीत सक्षम करणे, छळ पिळवणूक यापासून संरक्षण, मदत निवारा इत्यादी सुविधा पुरविण्यासाठी ज्येष्ठ नागरिक महामंडळ स्थापन करण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाशी (जि.धाराशिव) तालुक्यातील पवनचक्की उभारणीकरीता संपादित केलेल्या जमिनींकरीता अत्यल्प मोबदला दिल्याबाबत

**(१३) ५१०१ (१४-१२-२०२५) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशी (जि.धाराशिव) तालुक्यात सध्या विविध कंपन्यांकडून पवनचक्की प्रकल्प उभारणीचे काम सुरू असून यासाठी घेतलेल्या शेतजमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना तुटपुंजा दिल्याने योग्य मोबदला मिळावा, या मागणीसाठी वाशी तालुक्यातील जवळपास १० शेतकरी धाराशिवच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाला बसल्याचे तसेच त्यादरम्यान आंदोलनाच्या पाचव्या दिवशी तीन उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावल्याचे माहे जुलै, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,पवनचक्क्यांसाठी घेतलेल्या जमिनीचा अत्यल्प मोबदला देण्यात आलेल्या शेतकऱ्यांना उचीत मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१६-०३-२०२६) :** (१), (२) व (३) श्री.सुजित सुरेश मोरे रा.सारोळा (मा) व श्री.गणेश गोरख चौधरी मौ. तांदुळवाडी ता.वाशी, जि.धाराशिव येथील शेतकऱ्यांनी सेरेंटीका व रिनिवल पावर कंपन्यांनी शेतामध्ये उभ्या केलेल्या विद्युत वाहिनीसाठीच्या टॉवरकरीता लागणाऱ्या जमिनींच्या

असमान मोबदला वाटपाविरोधात दिनांक २८/०७/२०२५ पासून जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव येथे आमरण उपोषणाबाबतचे दिनांक २२/०७/२०२५ रोजीचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करुन दिनांक २८/०७/२०२५ पासून आमरण उपोषणास बसल्याची वस्तुस्थिती होती.

सदर उपोषणाच्या अनुषंगाने उक्त कंपन्यांच्या प्रतिनिधींसोबत शेतकरी प्रतिनिधींची बैठक जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये मोबदल्याच्या अनुषंगाने शासन निर्णय क्र.पावामो-२०२१/प्र.क्र.१७०/ऊर्जा-४, दिनांक ०१/१२/२०२२ अन्वये कार्यवाही करण्याचे निश्चित करण्यात आले.

---

## राज्यातील कृषी पदवीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती प्रलंबित असल्याबाबत

**(१४) ५१५३ (१४-१२-२०२५) श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय खोडके, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी पदवीचे शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जाती-जमाती, ओबीसी व इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शासनाकडून फी परतावा, भत्ता इत्यादी स्वरुपात आर्थिक सहाय्य मिळते, परंतु मागील वर्षांचा शिष्यवृत्तीचा निधी अद्यापी अप्राप्त असल्यामुळे महाविद्यालयांना इतर प्रशासकीय खर्च भागविणे अवघड झाले असून अनेक ठिकाणी कर्मचाऱ्यांचे वेतन दोन-दोन महिने केले जात नसल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सोयी-सुविधांवर परिणाम होवुन वसतिगृह, प्रयोगशाळा, प्रात्याक्षिके, संशोधन साहित्य आदिं आवश्यक सुविधा पुरविणे संस्थांना कठिण जात असल्याचे दिनांक १ सप्टेंबर,२०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रलंबित शिष्यवृत्तीच्या मुद्दयांवर अनुदान प्राप्त झाले ते प्राधान्याक्रमाने दिले जात असल्यामुळे आता सन २०२१-२२ पर्यंतची शिष्यवृत्ती पूर्ण करण्यात आलेली असून ज्यांची कागदपत्रे परिपूर्ण आहेत, बँक खाते जोडलेले आहे, अशांच्या खात्यात शिष्यवृत्ती जमा केली जात असल्याचे महासंचालक म.रा.कृषी शिक्षण व प्रशिक्षण यांच्याकडून सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने निधी उपलब्ध होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (१६-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) होय.
(३) कृषी विद्यापीठातील "राज्य शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेतंर्गत" राज्यातील कृषी विद्यापीठातील व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी "राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना" व "डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना" या योजनेतंर्गत शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात येतो.

तर, विद्यापीठे/महाविद्यालये यांच्या प्रशासकीय खर्चासाठी व कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी विद्यापीठांना सहायक अनुदानाखाली निधी अर्थसंकल्पीत करण्यात येतो.

चारही कृषी विद्यापीठांना सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात वित्त विभागाच्या धोरणानुसार सहायक अनुदान उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच, शिष्यवृत्ती योजनेतंर्गत शासनास प्राप्त मागणीनुसार निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शेतकऱ्यांचे ठिबक सिंचनाच्या अनुदानासाठी भरलेले अर्ज संगणकीय प्रणालीतून गायब झाल्याबाबत

**(१५) ५१६० (१४-१२-२०२५) श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महाडीबीटीची आधीची लॉटरी पध्दत रद्द करुन "प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य" हे तत्व शासनाने लागू केल्याने ठिबक अनुदानासाठी शेतकऱ्यांनी भरलेले २० हजार अर्ज संगणकीय प्रणालीतून गायब झाल्याचे तसेच सन २०२२ ते २०२४ या कालावधीत या योजनेसाठी शेतकऱ्यांनी लाखो अर्ज सादर केले असून शासनाच्या दिरंगाईमुळे सोडत काढण्यात आली नसल्याचे दिनांक १२ ऑगस्ट,२०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संगणकीय प्रणालीतून गायब झालेले अर्ज मिळण्याबाबत तसेच शेतकऱ्यांना ठिबक अनुदान मिळणेबाबत कृषी विभागाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (०२-०२-२०२६) : (**१) व (२) हे खरे नाही.
कृषी आयुक्तालय, पुणे कार्यालयाच्या दिनांक १२/०८/२०२५ च्या पत्रानुसार प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना प्रती थेंब अधिक पीक योजनेकरीता तांत्रिक अडचण दूर करण्याकरीता तसेच पोर्टल सुरळीत होईपर्यंत संबंधित लाभार्थ्यांचे अर्ज रद्द किंवा एसएलए (State Level Agency) ने रद्द करू नये व ऑटो कॅन्सल झालेले अर्ज तात्काळ रिव्होक करण्यात यावे, असे निर्देशित करण्यात आले होते.
यानुषंगाने संगणक प्रकल्प शाखा, कृषी आयुक्तालय, पुणे यांच्याकडून सन २०२०-२१ ते २०२५-२६ या वर्षातील २३,२१९ ऑटो कॅन्सल झालेले अर्ज ऑगस्ट, २०२५ अखेरपर्यंत रिव्होक करण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मराठवाडा विभागातील बहुतांशी गावातील लाभार्थ्यांना सामाजिक न्याय विभागांतर्गतच्या योजनांचे मानधन मिळाले नसल्याबाबत

**(१६) ५७२४ (१४-१२-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाकडून संजय गांधी निराधार,विधवा अथवा अपंग या लाभार्थ्यांसाठी दर महिन्याला मानधन दिले जाते परंतु मराठवाडा विभागातील बहुतांशी गावातील लाभार्थ्यांना अनेक महिन्यांपासून मानधन मिळाले

नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लाभार्थ्यांना मानधन मिळावे यासाठी तहसिल कार्यालयात वारंवार विचारणा करुन देखील कोणताही लाभ मिळत नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची पाळी आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन लाभार्थ्यांना नियमित मानधन मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (०६-०३-२०२६) :** (१) विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांचे आधार बँक खात्याशी लिंक नसणे, आधार अद्ययावत नसणे, आधार प्रमाणीकरण नसणे, तसेच दिव्यांग लाभार्थ्यांचे बोटांचे किंवा डोळ्यांचे ठसे स्कॅन न होणे, अशा विविध कारणांमुळे काही लाभार्थ्यांना अर्थसहाय्य मिळत नाही, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना या योजनेतील लाभार्थ्यांना अर्थसहाय्याचे वितरण डी.बी.टी. द्वारे करण्याचा शासनाने निर्णय घेतला असून, माहे डिसेंबर, २०२४ पासून सदरहू योजनेतील लाभार्थ्यांना अर्थसहाय्याचे वितरण त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात दरमहा नियमितपणे जमा करण्यात येत आहे.

या योजनेतील लाभार्थ्यांचे Aadhar अद्ययावत करणेबाबत तसेच त्यांचे बँक खाते आधारशी संलग्न करण्याबाबत शासनातर्फे जिल्हा/तालुका/मंडळस्तरावर युध्दपातळीवर विशेष मोहिम राबविण्याच्या सूचना वेळोवेळी सर्व जिल्हाधिकारी यांना दिलेल्या आहेत. तसेच शासनाकडून लाभार्थ्यांचे Aadhar अद्ययावत करणे व त्यांची माहिती डी. बी. टी. पोर्टलवर भरणेबाबत माहे मार्च, २०२४ पासून सर्व जिल्हाधिकारी यांच्याकडे सातत्याने पत्राद्वारे व VC द्वारे पाठपुरावा सुरु आहे.

विशेष सहाय्य योजनेतील डी.बी.टी पोर्टलवर नोंदणी झालेल्या आधार प्रमाणिकृत लाभार्थ्यांना दरमहा डी.बी.टी पोर्टलद्वारे अर्थसहाय्य थेट त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येत आहे. माहे जानेवारी, २०२६ अखेरे ४७,८८,५४१ इतक्या लाभार्थ्यांना डी.बी.टी पोर्टलद्वारे अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले आहे.

डी. बी. टी. पोर्टलद्वारे लाभार्थ्यांना अर्थसहाय्याचे वितरण त्याच महिन्यात नियमितपणे करण्यात येत आहे. तसेच ज्या लाभार्थ्यांचे अर्थसहाय्य प्रलंबित आहे. त्यांना अर्थसहाय्य देण्याची कार्यवाही विभागामार्फत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वर्धा नगरपरिषदेने मालमत्ता व पाणीपट्टी दरात वाढ केल्याबाबत

**(१७) २१५९७ (०५-०१-२०२४) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा नगरपरिषदेने मालमत्ता व पानपट्टी दरात मोठ्या प्रमाणात वाढ केल्याने सर्वसामान्य नागरिकांनी धरणे आंदोलन करून ही दरवाढ रद्द करण्याची मागणी केली असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा

त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वर्धा नगरपरिषदेने मालमत्ता व पानपट्टी दरात वाजवीपेक्षा जास्त वाढ केल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वर्धा नगरपरिषदेने थकीत करावरील व्याज माफ करावे आणि पाणीपुरवठा नियमित करून वाढवलेली मालमत्ता,पाणीपट्टी रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

नगरपरिषद वर्धा यांनी वर्ष २०२३-२४ ते २०२६-२७ या कालावधीकरीता चतुर्थ वार्षिक कर मुल्यांकनाची कार्यवाही केली असून त्यानुसार होणारी दरवाढ रद्द करण्यासाठी वर्धा शहरातील विविध राजकीय पक्ष व संघटनांमार्फत निवेदने प्राप्त झाली आहेत.
(२) हे अंशत: खरे आहे.

वर्ष २०२३-२४ ते २०२६-२७ या कालावधीकरीता नगरपरिषदेकडून फेर मुल्यांकन केलेल्या २७८३७ मालमत्तापैकी ६९५० इतक्या मालमत्ताधारकांचे आक्षेप प्राप्त झाले आहेत.
(३) नगरपालिका/नगरपरिषदा व नगरपंचात क्षेत्रातील थकित मालमत्ता करावरील शास्ती माफ करुन कर वसूल करण्यासाठी प्रोत्साहनात्मक अभय योजना राबविण्याबाबत दिनांक १९ मे, २०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खुलताबाद (जि.छत्रपती संभाजीनगर) नगरपरिषदेच्या हद्द वाढीचा प्रस्ताव मान्य करण्याबाबत

**(१८) २३०३५ (१६-०७-२०२४) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खुलताबाद (जि.छत्रपती संभाजीनगर) शहरालगतची, लिंगमळा, (लालमाती) वस्ती शहरात समाविष्ट करुन घेण्यासाठी दिनांक २८ जुलै, २०२३ रोजी विधानमंडळात यावर चर्चा होऊन मा.जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक १ ऑगस्ट, २०२३ रोजी संबंधितांची बैठक घेतली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खुलताबाद शहर हददवाढीचा परिपूर्ण प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनस्तरावर याबाबतीत कोणतीच कार्यवाही न झाल्याने, लिंगमळा, (लालमाती) येथील मागासवर्गीय नागरिकांना शासनाकडून मिळणाऱ्या सोई सुविधा उपलब्ध होत नसल्याने तेथील नागरिकांवर अन्याय असून जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी शासनाकडे दाखल केलेल्या खुलताबाद शहर हदद वाढीचा प्रस्ताव तात्काळ मान्य करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०२-२०२६) :** (१) अंशतः खरे आहे,

सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांच्याद्वारे दिनांक ३१ जुलै, २०२३ रोजी बैठक घेण्यात आली.

(२) हे खरे आहे,

तथापि, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने अतिरिक्त माहिती व कागदपत्र सादर करण्याबाबत दिनांक ०६/११/२०२३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना कळविण्यात आले होते.

(३) मा.राज्य निवडणूक आयोगाने त्यांच्या दिनांक १० मे, २०२२ रोजीच्या आदेशानुसार राज्यातील २५ जिल्हा परिषदा व २८४ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूकांचा प्रभाग रचनेबाबतचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे, त्यामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा समावेश आहे. तसेच मा.राज्य निवडणूक आयोगाने दिनांक २४ मे, २०२२ रोजीच्या आदेशान्वये, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका पूर्ण होईपर्यंत त्यांच्या हद्दीमध्ये व रचनेमध्ये कोणताही बदल करु नये, असे निर्देश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर येथील राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या आगारांची संख्या वाढविण्याबाबत

**(१९) २३६८९ (१६-०७-२०२४) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूरमध्ये एस.टी.महामंडळाचे एकूण ८ डेपोंमध्ये ४३२ बसेस असून २४ नवीन इलेक्ट्रिक बसेस चालविण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर येथील वाहतुकीची स्थिती पाहता नागपूरमध्ये डेपोची संख्या वाढविण्याबाबत तसेच इलेक्ट्रिक बसेस योग्य पध्दतीने रस्त्यांवर चालविण्यासाठी वेगवेगळया ठिकाणी चार्जिंग स्टेशन उभारण्यात येणार आहेत काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने नागपूर येथे वाहतुकीच्या समस्येचे निराकरण करण्याच्या दृष्टीने एसटी महामडळाच्या डेपोंची संख्या वाढवून इलेक्ट्रिक बसेस योग्य पध्दतीने रस्त्यांवर चालविण्यासाठी वेगवेगळया ठिकाणी चार्जिंग स्टेशन उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.प्रताप सरनाईक (२०-०३-२०२६) :** (१), (२), (३) व (४) रा.प महामंडळातील नागपुर विभागामध्ये एकूण ०८ आगार कार्यात असून ते पर्याप्त आहेत. ०८ आगारात एकूण ४७२ एवढया बसेस उपलब्ध असून, त्यापैकी ५९ ई-बसेस चालणात आहेत.

तसेच नागपूर विभागातील ०४ आगारामध्ये चार्जिंग स्टेशन उभारण्यात आले असून, ०४ आगारामध्ये चार्जिंग स्टेशन उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे.

---

## बाभळगाव (जि.लातूर) येथील महावितरणाच्या उपकेंद्रात तरुणाचा विजेच्या धक्क्यामुळे मृत्यू झाल्याबाबत

**(२०) २४१८९ (०५-०९-२०२४) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाभळगाव (जि.लातूर) येथील महावितरणाच्या उपकेंद्रात विदयुत काम करणाऱ्या एका तरुणाचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाल्याचे दिनांक १२ मे,२०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मृत तरुणांच्या कुटुंबियांना शासनाने कोणत्या स्वरुपाची आर्थिक वा अन्य स्वरुपाची मदत केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उपरोक्त दुर्दैवी मृत्यू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने याप्रकरणी निष्काळजीपणा करणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१७-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर मृत व्यक्तिच्या कुटुंबियांना महावितरण कंपनीच्या नियमानुसार आर्थिक मदत म्हणून रुपये ४.०० लाख इतकी आर्थिक मदत दिनांक १६/०५/२०२४ रोजी देण्यात आली आहेत.

(३) सदर प्राणांतिक विद्युत अपघात प्रकरणी विद्युत निरीक्षक कार्यालय, लातूर यांनी चौकशी केली आहे. त्यांचेकडून प्राप्त अहवालानुसार या अपघातास महावितरण कंपनी व अपघातग्रस्त यांची संयुक्तिक जबाबदारी असल्याचे नमूद करण्यात आले आहे. सदर घटनेच्या दिवशी ३३/११ केव्ही बाभळगाव उपकेंद्र येथे कर्तव्यावर हजर असलेले प्रधान यंत्रचालक श्री.तानाजी यादवराव लोकरे हे दोषी असल्याचे निदर्शनास आल्यामुळे त्यांना दिनांक १३/०५/२०२४ पासून महवितरण कंपनीच्या सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. तसेच विभागीय चौकशी अहवालानुसार शिक्षा बजावण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. विलास आठवले**
**मुंबई.** **सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.